Registered No. B. L.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 13TH MAY 1897.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २८ माहे जानेवारी सन १८९७ रोजीं संमति दिली, आणि तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९७ चा आक्ट २ रा.

**सन १८७१ चा गुन्हे करणारे जातींविषयींचा आक्ट सुधारण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थीं सन १८७१ चा गुन्हे करणारे जातींविषयींचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) ह्या आक्टास गुन्हे करणारे जातींविषयींचा आक्ट सुधारण्याकरितां सन १८९७ चा आक्ट असें ह्मणावें; आणि

सरनामा व सुरवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८७१ चा गुन्हे करणारे जातींविषयींचा आक्ट, कलम १, ह्यांत खालीं लिहिलेला विशेष ठराव जास्त दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

सन १८७१ चा आक्ट २७ वा, कलम १, यांत विशेष ठराव दाखल करणें.

"मात्र इतकेंच कीं, कोणत्याही स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या पूर्वी घेतलेल्या मंजुरीनिशीं, आणि स्थानिक सरकारी गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून त्याच्या द्वारें, ह्यानंतर झालेल्या कायद्यांअन्वयें सुधारलेल्या ह्या आक्टांतील सर्व किंवा कोणतेही ठराव, आपल्या अमलाखालील सगळ्या प्रदेशांत किंवा त्या प्रदेशाच्या कोणत्याही भागांत अमलांत येतील असें जाहीर करण्याचा अखत्यार आहे."

३. सन १८७१ चा गुन्हे करणारे जातींविषयींचा आक्ट, कलम १, ह्यानंतर खालील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

सन १८७१ चा आक्ट २७ वा, कलम १, ह्यानंतर नवीन कलम दाखल करणें.

जात, टोळी व वर्ग यांची व्याख्या.

"१ अ. ह्या आक्टांत, 'जात', 'टोळी' व 'वर्ग' ह्या शब्दांत कोणत्याही जातीच्या, टोळीच्या अगर वर्गाच्या कोणत्याही भागाचा अगर असामींचा समावेश होतो असें समजावें."

सन १८७१ चा आक्ट २७ वा, कलम १७, ह्यानंतर नवीन कलम दाखल करणें.

मुलांसाठीं स्थापिलेल्या सन्मार्गप्रवर्तक ठाण्यांत मुलांस घालण्याचा व त्यांस काम शिकविण्याकरितां ठेवण्याचा अधिकार.

४. सदहू आक्टाचें कलम १७ ह्यानंतर खालील कलम जास्त दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

"१७ अ (१) स्थानिक सरकारास, मुलांकरितां सन्मार्गप्रवर्तक ठाणीं स्थापण्याचा व तीं चालू ठेवण्याचा, आणि गुन्हे करणारी ह्मणून ठरविलेल्या कोणत्याही जातीपैकीं, टोळीपैकीं अगर वर्गापैकीं नोंदलेल्या असामींच्या मुलांस त्यांच्या आईबापांपासून काढून अशा एकाद्या सन्मार्गप्रवर्तक ठाण्यांत ठेवण्याचा अखत्यार आहे.

"(२) पोटकलम (१) अन्वयें मुलांसाठीं स्थापिलेल्या दरेक सन्मार्गप्रवर्तक ठाण्याकरितां स्थानिक सरकारानें एक सुपरिंटेंडंट नेमिला पाहिजे.

"(३) मुलांकरितां स्थापिलेल्या सन्मार्गप्रवर्तक ठाण्याचा सुपरिंटेंडंट, अशा ठाण्यांत ठेविलेल्या दरेक मुलाचा, सन १८९० चा आक्ट १९ वा ( काम शिकण्याकरितां ठेवावयाचीं मुलें असतील त्यांचा करारनामा करण्याविषयीं आक्ट ) याच्या अर्थाअन्वयें राखणदार समजला जाईल, आणि अशा सुपरिंटेंडंटास योग्य वाटल्यास त्याला, स्थानिक सरकार ह्या संबंधाच्या कानू करील त्यांस अनुसरून, त्या मुलाला सदहू आक्टाच्या ठरावांअन्वयें काम शिकण्याकरितां ठेवण्याचा अखत्यार आहे.

**खुलासा.**—ह्या कलमांतील "मुलें" ह्या संज्ञेंत, चार वर्षांवरील व अठरा वर्षांखालील सर्व माणसांचा समावेश होतो.

सन १८७१ चा आक्ट २७ वा, कलम १९, ह्याच्या बदलीं नवीन कलम दाखल करणें.

कानूंचें उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा.

५. सदहू आक्टाच्या १९ व्या कलमाच्या बदला खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

"१९. (१) ह्या आक्टाअन्वयें नोंदलेला जो कोणताही मनुष्य, १८ व्या कलमाच्या (४) थ्या रकमेअन्वयें, (५) व्या रकमेअन्वयें अगर (६) व्या रकमेअन्वयें केलेल्या कानूचा भंग करील तो, पहिल्यानें गुन्ह्याची शाबिती झाली ह्मणजे पराकाष्ठा एका वर्षाच्या, दुसऱ्यानें शाबिती झाली ह्मणजे पराकाष्ठा दोन वर्षांच्या, व त्यानंतर कोणतीही शाबिती झाली ह्मणजे पराकाष्ठा तीन वर्षांच्या सक्त मजुरीच्या कैदेस पात्र होईल; आणि तो, शाबिती पहिली असो अगर तदनंतरची कोणतीही असो, फटक्यांच्या शिक्षेसही पात्र होईल.

(२) गुन्हे करणारी ह्मणून जाहीर केलेल्या जातीपैकीं जो कोणताही असामी कलम १८ ह्यांतील इतर कोणत्याही रकमेअन्वयें केलेल्या कानूचा भंग करील, तो, पराकाष्ठा सहा महिन्यांच्या सक्त मजुरीच्या कैदेस, किंवा दंडास, किंवा फटक्यांस, किंवा ह्या सर्व अगर ह्यांपैकीं कोणत्याही दोन शिक्षांस पात्र होईल; आणि ह्या प्रकारच्या कोणत्याही कानूचा भंग केल्याची त्यानंतर आणखी कोणतीही शाबिती झाली ह्मणजे, तो, पराकाष्ठा एका वर्षाच्या सक्त मजुरीच्या कैदेस, किंवा दंडास किंवा फटक्यांस, किंवा ह्या सर्व अगर ह्यांपैकीं कोणत्याही दोन शिक्षांस पात्र होईल."

सन १८७१ चा आक्ट २७ वा, कलम १९, ह्यानंतर दोन नवीन कलमें दाखल करणें.

अपराध करणाऱ्या जातींतल्या असामींवर पूर्वी शाबितीचा ठराव झाल्यानंतर त्यांनीं विवक्षित अपराध केले असतां त्यांबद्दल जास्त शिक्षा.

६. सदहू आक्टाच्या १९ व्या कलमानंतर दोन नवीन कलमें दाखल करावीं: तीं येणेंप्रमाणें:—

"१९ अ. जो कोणताही मनुष्य, अपराध करणारी ह्मणून ठरविलेल्या कोणत्याही जातीचा, टोळीचा अगर वर्गाचा असामी असून, ज्यावर, ह्या आक्टास जोडिलेल्या परिशिष्टांत हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याखालील जे अपराध निर्दिष्ट केलेले आहेत त्यांपैकीं कोणताही अपराध केल्याची शाबिती झालेली असेल, त्यावर, तदनंतर, तोच अगर सदहू परिशिष्टांत निर्दिष्ट केलेला इतर कोणताही

अपराध केल्याची शाबिती होईल, तर, त्याला, कोर्टानें आपल्या फैसल्यांत त्याला खालील शिक्षा न देण्याबद्दल विशेष कारणें सांगितली नसलीं तर, ह्याप्रमाणें अपराधाची दुसरी शाबिती झाल्यावर, सात वर्षांहून कमी नाहीं इतकी सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे, आणि अपराधाची तिसऱ्यानें शाबिती झाली असतां जन्मभर काळे पाण्याची शिक्षा दिली पाहिजे.

"सदर्हू प्रकारचा मनुष्य हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद आक्ट याअन्वयें किंवा इतर कोणत्याही कायद्याअन्वयें ज्या कोणत्याही जास्त किंवा इतर शिक्षेस पात्र असेल, त्या शिक्षेच्या त्याच्या पात्रतेस ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून बाध येणार नाहीं."

१९ ब. जो कोणताही मनुष्य, अपराध करणारी ह्मणून ठरविलेल्या कोणत्याही जातींतला, टोळींतला अगर वर्गातला असामी असून जो कोणत्याही जागीं अशा स्थितींत सांपडेल कीं, तो चोरी किंवा जबरीची चोरी करण्याच्या अगर तसें कृत्य करण्यास मदत करण्याच्या बेतांत होता अशाबद्दल किंवा तो चोरी अगर जबरीची चोरी करण्याची संधि पाहत होता अशाबद्दल कोर्टाची खातरी होईल, तो मनुष्य, पराकाष्ठा तीन वर्षांच्या सक्त मजुरीच्या कैदेस व दंडासही पात्र होईल.".

संशयकारक अशा स्थितींत सांपडलेल्या अपराध करणाऱ्या जातींतल्या असामींस शिक्षा.

७. सदर्हू आक्टांत, ह्या आक्टाच्या परिशिष्टांतील परिशिष्ट जास्त दाखल करावें.

सन १८७१ चा आक्ट २७ वा, ह्यांत परिशिष्ट दाखल करणें.

---

# परिशिष्ट.

(कलम ७ पहा.)

## परिशिष्ट.

(कलम १९ अ पहा.)

**हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबदचा कायदा ह्याच्या १६ व्या व १७ व्या बाबींअन्वयें शिक्षा करावयाचे विवक्षित अपराध.**

---

## बाब १६.

कलमें.

२९९. सदोष मनुष्यवध.

३०७. खून करण्याचा प्रयत्न.

३०८. सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न.

३१०. ठग.

३१२. आपखुशीनें मोठी दुखापत करणें.

३२४. घातक शस्त्राच्या अगर साधनाच्या द्वारें आपखुशीनें दुखापत करणें.

३२६. घातक शस्त्राच्या अगर साधनाच्या द्वारें आपखुशीनें मोठी दुखापत करणें.

३२७. जुलमानें माल घेण्याकरितां अगर जुलमानें एकादें गैरकायद्याचें कृत्य करविण्याकरितां आपखुशीनें दुखापत करणें.

३२८. अपराध करावयाच्या इरादानें विष वगैरेच्या उपायांनीं दुखापत करणें.

३२९. जुलमानें माल घेण्याकरितां अगर जुलमानें एकादें गैरकायद्याचें कृत्य करविण्याकरितां आपखुशीनें मोठी दुखापत करणें.

३३२. सरकारी नौकराला दहशत पडून त्यानें आपलें नौकरीचें काम करूं नये ह्मणून त्यास आपखुशीनें दुखापत करणें.

कलमें.

३३३. सरकारी नौकराला दहशत पडून त्यानें आपलें नौकरीचें काम करूं नये ह्मणून त्यास आपखुशीनें मोठी दुखापत करणें.

## बाब १७.

३८२. चोरी करावयाकरितां जीव घेण्याची अगर दुखापत करण्याची अगर प्रतिबंध करण्याची तयारी करून चोरी करणें.

३८३. जुलमानें घेणें.

३८५. जुलमानें घेणें हा अपराध करावयाकरितां कोणा मनुष्यास दुखापत करण्याचें भय घालणें.

३८६. कोणा मनुष्यास जीव घेण्याचें अगर मोठी दुखापत करण्याचें भय घालून जुलमानें घेणें हा अपराध करणें.

३८७. जुलमानें घेणें हा अपराध करावयाकरितां कोणा मनुष्यास जीव घेण्याचें अगर मोठी दुखापत करण्याचें भय घालणें.

३९०. जबरीची चोरी.

३९१. दरवडा.

३९३. जबरीची चोरी करण्याचा प्रयत्न करणें.

३९४. जबरीची चोरी करतांना आपखुशीनें दुखापत करणें.

३९७. जीव घेण्याचा अगर मोठी दुखापत करण्याचा प्रयत्न करून जबरीची चोरी करणें अगर दरवडा घालणें.

३९८. मारक शस्त्र जवळ असून जबरीची चोरी करण्याचा अगर दरवडा घालण्याचा प्रयत्न करणें.

३९९. दरवडा घालण्याची तयारी करणें.

४०२. दरवडा घालण्याकरितां जमणें.

४५८. कोणास दुखापत करण्याची किंवा कोणाच्या आंगावर जाण्याची किंवा कोणास अन्यायानें प्रतिबंध करण्याची तयारी केल्यावर छपून बसून रात्रीस घराविषयीं आगळीक किंवा घर फोडण्याचा अपराध करणें.

४५९. छपून बसून घराविषयीं आगळीक करीत असतांना अगर घर फोडण्याचा अपराध करीत असतांना केलेली मोठी दुखापत.

४६०. रात्रीस छपून बसून घराविषयीं आगळीक किंवा घर फोडण्याचा अपराध एकत्र मिळून करणाऱ्यांपैकीं कोणीं जीव घेतला असतां अगर मोठी दुखापत केली असतां त्याबद्दल तीं सर्व मनुष्यें शिक्षेस पात्र आहेत.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ११ माहे मार्च सन १८९७ रोजीं संमति दिली; आणि तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९७ चा आक्ट ९ वा.

### सरकारी व इतर प्राव्हिडेंट फंडांसंबंधी कायदा सुधारण्यासाठीं आक्ट.

ज्या अर्थी सरकारी व इतर प्राव्हिडेंट फंडांसंबंधी कायदा सुधारणें योग्य आहे, त्या अर्थी यावरून खालीं सांगितल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:

१. (१) या आक्टास सन १८९७ चा प्राव्हिडेंट फंडांबाबद आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरवात.

(२) तो उत्तर ब्रह्मदेश व ब्रिटिश बलुचिस्थान धरून सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. या आक्टांत— व्याख्या.

(१) "प्राव्हिडेंट फंड" या संज्ञेचा अर्थ, ज्या फंडांत कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या नोकरलोकांच्या वर्गण्या किंवा ठेवी घेण्यांत येऊन त्यांच्या त्यांच्या वेगवेगळ्या खातीं ठेवल्या जातात तो फंड, असा आहे, आणि त्या संज्ञेंत, त्या फंडाच्या नियमांअन्वयें अशा वर्गण्यांच्या किंवा ठेवींच्या संबंधानें जमा करण्यांत आलेल्या कोणत्याही रकमांचा, आणि त्या वर्गण्या किंवा ठेवी यांवर चढणाऱ्या कोणत्याही व्याजाचा समावेश होतो:

(२) "सरकारी प्राव्हिडेंट फंड" या संज्ञेचा अर्थ, सरकारच्या कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या नोकरलोकांसाठीं त्या सरकारच्या अखत्यारावरून स्थापन केलेला कोणताही प्राव्हिडेंट फंड असा आहे:

(३) "रेलवे प्राव्हिडेंट फंड" या संज्ञेचा अर्थ, हिंदुस्थान सरकारच्या अखत्यारावरून किंवा पार्लमेंटाच्या एखाद्या विशेष आक्टाअन्वयें किंवा सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांशीं अगर हिंदुस्थान सरकाराशीं केलेल्या कराराअन्वयें जी कोणतीही कंपनी ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही रेलवेचा किंवा ट्राम्वेचा कारभार करीत असेल त्या कंपनीच्या अखत्यारावरून, त्या रेलवेवरील, किंवा त्या रेलवेसंबंधी, अगर त्या ट्राम्वेवरील

किंवा त्या ट्राम्वेसंबंधी कोणत्याहीं वर्गाच्या किंवा वर्गांच्या नौकरलोकांसाठीं स्थापन केलेला प्राव्हिडेंट फंड असा आहे; आणि

(४) "अवश्य ठेव" या संज्ञेचा अर्थ, वर्गणीदारानें किंवा ठेव देणारानें मागितली असतां, अगर त्याच्या मर्जीप्रमाणें, जी परत देतां येत नाहीं अशी वर्गणी किंवा ठेव असा आहे; आणि त्या संज्ञेत, फंडाच्या नियमांअन्वयें अशा वर्गणीच्या किंवा ठेवीच्या संबंधानें जी कोणतीही दिलेली रकम जमा करण्यांत आली असेल तिचा व त्या वर्गणीवर किंवा ठेवीवर जें कोणतेंहि व्याज चढलें असेल किंवा रकम वाढली असेल त्या व्याजाचा किंवा वाढलेल्या रकमेचा समावेश होतो.

वर्गणीदार किंवा ठेव देणार मरण पावल्यावर सरकारी किंवा रेलवेचा प्राव्हिडेंट फंड यांतून पैका देण्याबाबद.

३. (१) कोणत्याही सरकारी किंवा रेलवे प्राव्हिडेंट फंडाचा एखादा वर्गणीदार किंवा त्या फंडांत ठेव देणारा मरण पावला असून त्या फंडाच्या बुकांत त्याच्या खातीं जमा असलेली रकम दोन हजार रुपयांहून अधिक नसेल, तेव्हां, ती रकम अदा करण्याचें काम ज्या अमलदाराचें असेल त्या अमलदाराला ती खालीं सांगितल्याप्रमाणें अदा करण्याचा अधिकार आहे:—

(अ) त्या फंडाच्या नियमांप्रमाणें ती रकम मिळण्याचा ज्या कोणत्याही मनुष्यास हक्क असेल त्यास, अगर ज्या कोणत्याही मनुष्याची मरण पावलेल्या वर्गणीदारानें किंवा ठेव देणारानें ती रकम घेण्यासाठीं लेखी नेमणूक केली असेल त्या मनुष्यास ती न देण्याबद्दल फंडाचा कोणताही नियम नसेल तर, त्या मनुष्यास, ती देण्याचा त्या अमलदाराला अधिकार आहे;

(ब) या कलमांत वर ठराव केलेला नाहीं अशा कोणत्याही बाबतींत, ज्या कोणत्याही मनुष्यास ती रकम घेण्याचा हक्क आहे असें त्या अमलदारास वाटेल त्या मनुष्यास ती देण्याचा त्या अमलदाराला अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) यांतील ठराव, जी कोणतीही रकम, या आक्टाच्या सुरवातीच्या वेळीं, आधींच मरण पावलेल्या कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेव देणाराच्या खातीं जमा असेल त्या रकमेस लागू होतील.

(३) कोणत्याही फंडाच्या नियमांमध्यें दोन हजार रुपयांहून जास्त रकमांची व्यवस्था करण्यासंबंधाचे जे कांहीं ठराव असतील त्यांच्या कायदेशीरपणास ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून बाध येणार नाहीं.

सरकारी व रेलवे प्राव्हिडेंट फंड जप्त करतां कामा नयेत.

४. या आक्टाच्या सुरवातीनंतर, कोणत्याही सरकारी किंवा रेलवे प्राव्हिडेंट फंडांतील अवश्य ठेवी, अशा फंडाच्या वर्गणीदारानें किंवा त्या फंडांत ठेव देणारानें जें कोणतेंही कर्ज केलें असेल किंवा तो ज्या कोणत्याही जबाबदारीस पात्र झाला असेल त्या कर्जाच्या किंवा जबाबदारीच्या बाबतींत कोणत्याही न्यायाच्या कोर्टानें केलेल्या कोणत्याही हुकुमनाम्यावरून किंवा हुकुमावरून जप्त केल्या जाण्यास पात्र नाहींत असें समजावें. आणि त्याचप्रमाणें, आफीशियल असैनीचा, किंवा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या २० व्या बाबीअन्वयें नेमिलेल्या कोणत्याही रिसीव्हराचा अशा कोणत्याही अवश्य ठेवीवर कोणताही हक्क किंवा दावा चालणार नाहीं.

या आक्टाअन्वयें इमानानें केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल संरक्षण.

५. जें कोणतेंही कृत्य या आक्टाच्या ठरावांस अनुसरून करण्यांत आलें असेल किंवा करण्याचा इरादा इमानानें केलेला असेल त्या कृत्याच्या संबंधानें कोणत्याही मनुष्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर काम चालणार नाहीं असें समजावें.

६. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून त्याच्या द्वारें, या आक्टाचे ठराव, सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबद आक्ट याच्या अर्थाप्रमाणेंच्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यानें आपल्या नोकरलोकांच्या हितासाठीं स्थापन केलेल्या कोणत्याही इतर प्राव्हिडेंट फंडास लागू करण्यास मुखत्यार आहेत.

इतर प्राव्हिडेंट फंडांना हा आक्ट लागू करण्याचा अधिकार.

७. जो कोणताही युरोपियन अमलदार, विनसनदी अमलदार किंवा लष्करी शिपाई हिंदुस्थानांत मलिका माआझमांच्या नोकरींत असतांना मरण पावेल त्याच्या, किंवा जो कोणताही युरोपियन आपल्या मरणाच्या वेळीं अशा नोकरीवरून फरारी असेल त्याच्या, एस्टेटीच्या पैक्यास ३ ऱ्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं असें समजावें.

लष्करी शिपायांच्या एस्टेटीच्या संबंधानें अपवाद.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

---

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २६ माहे मार्च सन १८९७ रोजीं संमति दिली; आणि तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—**

## सन १८९७ चा आक्ट १२ वा.

**स्थानिक अधिकाऱ्यांस तात्पुरत्या निकडीच्या प्रसंगांसाठीं पैका कर्जी काढण्यास अधिकार देण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थीं स्थानिक अधिकाऱ्यांस तात्पुरत्या निकडीच्या प्रसंगांसाठीं पैका कर्जी काढण्याचा अधिकार देणें योग्य आहे, त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा, व्याप्ति व सुरवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८९७ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं (निकडीच्या प्रसंगीं) पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

दुष्काळाच्या किंवा सांतीच्या रोगांच्या प्रसंगीं, स्थानिक अधिकाऱ्यांस पैका कर्जी काढण्याचा अधिकार.

२. (१) सन १८७२ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट यांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांत कोणताही ठराव असला तरी, सदहू आक्टांत व्याख्या केलेल्या स्थानिक अधिकाऱ्यास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या आधीं घेतलेल्या मंजुरीनें, खालीं लिहिलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं, आपले फंड तारण लावून देऊन, पैका कर्जी काढण्याचा अधिकार आहे: तीं कारणें येणेंप्रमाणें:—

(अ) दुष्काळाच्या किंवा महर्गतेच्या वेळीं मदत देणें आणि मदतीचीं कामें स्थापणें व चालू ठेवणें;

(ब) कोणताही भयंकर सांतीचा रोग सुरू होऊं न देणें किंवा त्याचा प्रसार बंद करणें; आणि

(क) ज्या कोणत्याही तजविजींचा सदरील कारणांपैकीं कोणत्याही कारणांशीं संबंध असेल किंवा ज्या कोणत्याही तजविजी त्या कारणांमुळें कराव्या लागतील, त्या तजविजी करणें.

(२) त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्यावरून ज्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याला ज्या कोणत्याही कारणाकडे आपले फंड लावण्याचा अधिकार पोंचत नसेल, त्या स्थानिक अधिकाऱ्यास तशा कारणासाठीं पैका कर्जी काढण्याचा अगर खर्चण्याचा अधिकार या कलमांतील कोणत्याही ठरावावरून प्राप्त होतो असें समजूं नये.

शर्ती घालून देण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा अधिकार.

३. (१) गेल्या शेवटल्या कलमाखालील दरेक कर्ज, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस ज्या कोणत्याही अटी व शर्ती घालून देणें योग्य वाटेल त्या अटींस व शर्तींस पात्र ठेवून दिलें जाईल.

(२) विशेष रीतीनें आणि पोटकलम (१) यांतील ठरावांस साधारणपणें बाध न येतां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस सामान्य किंवा विशेष हुकुमाच्या द्वारें खालील बावती ठरविण्याचा अधिकार आहे : त्या बाबती येणें प्रमाणें:—

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा स्थानिक सरकारानें ह्या आक्टाअन्वयें ज्या शर्तींप्रमाणें पैका कर्जी दिला असतां चालेल त्या शर्ती ठरविणें ;

(ब) अशीं कर्जें ज्या शर्तींवर द्यावयाचीं असतील त्या शर्ती दाखल करण्याची व त्या अमलांत आणण्याची रीत ठरविणें ;

(क) अशा कर्जानें केलेलीं कोणतींही कामें किंवा केलेला कोणताही खर्च तपासणें ;

(ड) अशीं कर्जें ज्या हप्त्यांनीं परत द्यावयाचीं ते हप्ते, त्यांवर घ्यावयाचें व्याज, आणि अशीं कर्जें परत करण्याची व त्यांवरील व्याज द्यावयाची रीत व मुदत ठरविणें ; आणि

(इ) अशा कर्जासंबंधानें कोणते हिशोब ठेवावयाचे तें ठरविणें.

४. सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबावदचा आक्ट, ह्याच्या ६ व्या व ७ व्या कलमांतले ठराव, ह्या आक्टाअन्वयें पैका कर्जी काढण्याच्या बाबतींत लागू होतील. सन १८७९ चा आक्ट ११वा, कलमें ६, व ७ लागू असणें.

५. जें कोणतेंही कर्ज तारीख १ माहे जानेवारी सन १८९७ नंतर आणि ह्या आक्टाच्या सुरवातीच्या आधीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं अगर त्यांच्या मजुरीनें, कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यास, ह्यांत पूर्वी सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं दिलेलें असेल, त्या कर्जास ह्या आक्टांतील ठराव लागू होतील; आणि असें दरेक कर्ज ह्या आक्टाअन्वयें देण्यांत आलें आहे असें समजलें पाहिजे. ह्या आक्टाच्या सुरवातीच्या आधीं दिलेल्या कर्जास हा आक्ट लागू असणें.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.